
दैनिक
आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

मोठेपणाने वागण्यासाठी अहंकाराला त्याग करावा लागतो.



लोहारा तालुक्यातील हॉटेल आणि ढाब्यांवर सर्रास होतेय अवैध दारूविक्री



■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 110 ■ शुक्रवार दि.30 मे 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# सोयाबीनला अच्छे दिन कधी..? मोदींनी ६ हजारांचा शब्द पाळलाच नाही, हमीभाव ५३२८

## शासनाकडून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची क्विंटलला ४३६ रुपयांनी बोळवण

### सहा हजार रुपये भाव देण्याचे आश्वासन हवेत विरले

### शासन म्हणते सोयाबीनचा उत्पादन खर्च साडेतीन हजार

सज्जन यादव | आरंभ मराठी

धाराशिव –केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. सोयाबीनला क्विंटलला सहा हजार रुपये हमीभाव देण्याचे आश्वासन देणाऱ्या शासनाने क्विंटल मागे केवळ ४३६ रुपयांची वाढ करून ५३२८ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. उडीद आणि तूर या पिकांच्या किंमतीत देखील केवळ चारशे रुपयांची वाढ केली आहे तर मूग या पिकामध्ये क्विंटलला केवळ ८६ रुपये वाढ केली आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशा आली असून, यावर्षीही बाजारात सोयाबीनची मातीची होणार अशी भावना सोयाबीन उत्पादक शेतकरी व्यक्त करत आहेत.

केंद्र सरकारने दोन दिवसांपूर्वी खरीप हंगामातील पिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर केल्या आहेत. यामध्ये सोयाबीन पिकाच्या भावाल अपेक्षित वाढ न केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. केंद्र सरकारच्या या किंमतीकडे धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी डोळे लावून बसले होते. कारण यामध्ये सोयाबीन या धाराशिव जिल्ह्यातील प्रमुख असलेल्या पिकाची देखील किंमत जाहीर होणार होती. मागच्या वर्षी सरकारने सोयाबीन साठी ४८९२ रुपये प्रतिक्विंटल दर जाहीर केला होता. परंतु मागच्या वर्षी जाहीर केलेला दर शेतकऱ्यांना परवडणारा नव्हता. यावर्षी शेतकरी वारंवार सोयाबीनसाठी ६००० हजार रुपये दर जाहीर करावा अशी मागणी करत होते. परंतु, सरकारने मात्र शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करत क्विंटलमागे फक्त ४३६ रुपयांची वाढ करून सोयाबीनचा हमीभाव ५३२८ रुपये जाहीर केला. त्यामुळे शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. खते, बी–बियाणे, मजुरी यांचे दर दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असताना, शेतकऱ्यांना ५३२८ रुपयांचा दर कसा परवडणार, असा सवाल शेतकरी करत आहेत. सोयाबीन पिकाचा एकरी उत्पादन खर्च २५४०० रुपये येतो. तर धाराशिव जिल्ह्यात सोयाबीनचे एकरी ५ किंटल उत्पादन होते. सोयाबीन उत्पादनाचा प्रति क्विंटल खर्च ५०८० रुपये असताना शासनाने सोयाबीनचा उत्पादन खर्च फक्त ३५५२ रुपये पकडला आहे. ५३२८ रुपये हमीभाव जाहीर करून प्रति क्विंटल फक्त २४८ रुपये शेतकऱ्यांचा फायदा होत आहे. वर्षभर मेहनत करून क्विंटलला फक्त २४८ रुपये मिळणार असतील तर शेतकऱ्यांनी शेती कशी करायची? असा सवाल विचारला जात आहे.सोयाबीन हे धाराशिव जिल्ह्यातील प्रमुख नगदी पीक असल्याने जिल्ह्याची अर्थव्यवस्था या पिकावर अवलंबून आहे.



### शेतकऱ्यांची मागणी ६००० रुपयांची

सोयाबीनसाठी किमान ६००० रुपये हमीभाव जाहीर करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून वारंवार होत आहे. परंतु, सरकारने त्याची दखल घेतली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विधानसभा निवडणुकी दरम्यान सोयाबीनला सहा हजार रुपये क्विंटल हमीभाव देण्याचे सूतोवाच केले होते. त्यामुळे यावर्षी सोयाबीन उत्पादक शेतकरी हमीभावाकडे डोळे लावून बसले होते. सोयाबीनचा उत्पादन खर्च पाच हजार पेक्षा जास्त होत असल्यामुळे शेतकरी आणि प्रमुख विरोधी पक्ष सहा हजार रुपये प्रति क्विंटलची मागणी करत होते, परंतु ही मागणी पूर्ण झाली नाही.

### ११ वर्षात केवळ २७२८ रुपयांची वाढ

सोयाबीन पिकाच्या हमीभावात मागील अकरा वर्षात फक्त २७२८ रुपयांची वाढ सरकारने केलेली आहे. या अकरा वर्षात खतांच्या किंमतीत पाचपट वाढ झालेली आहे तर मजुरीत दुप्पट वाढ झाली आहे. त्या तुलनेत सोयाबीनच्या भावात झालेली वाढ नगण्य आहे. सोयाबीन हे शेतकऱ्यांसाठी आतबट्याचे पीक ठरत आहे.

- ■ एकरी उत्पादन – ५ क्विंटल
- ■ प्रति क्विंटल खर्च – ५०८० रुपये
- ■ सरकारने जाहीर केलेला हमीभाव ५३२८ रुपये

### सोयाबीन उत्पादन खर्चाचे गणित

| | |
|---|---|
| नांगरणी – | २००० |
| मोगडणी – | १००० |
| कुळवणी – | १००० |
| पेरणी – | १००० |
| बियाणे – | ३००० |
| खत – | २००० |
| कोळपणी – | ३००० |
| फवारणी – | ३४०० |
| काढणी – | ४००० |
| मळणी – | २००० |
| इतर खर्च – | ३००० |
| एकूण खर्च – | २५४०० |

- ■ प्रति क्विंटल शेतकऱ्यांना होणारा फायदा २४८ रुपये
- ■ शासनाच्या हमीभावाने ५ क्विंटल सोयाबीन विक्री करून मिळणारे पैसे २६६४० रुपये
- ■ शेतकऱ्याचा प्रति एकर उत्पादन खर्च २५४०० रुपये

म्हणजे एक एकर सोयाबीन शेतीतून शेतकऱ्यांना फक्त १२४० रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे. एवढ्या कमी पैशासाठी शेतकऱ्याने शेती करावी कशी करावी? असा प्रश्न शेतकऱ्यांनाचआहे.

## तुळजापूर ड्रग्जप्रकरणी आणखी आरोपीस अटक

### एकूण ३७ आरोपी निष्पन्न, चौदा दिवसाची पोलीस कोठडी

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर ड्रग्ज रॅकेट प्रकरणी पोलिसांनी शुभम नेपते या नविन संशयित आरोपीस अटक केली असून, नेपते यास बुधवारी रात्री तुळजापूर येथून पोलीसांनी अटक केली आहे. त्यास गुरुवारी न्यायालयात हजर केले असता चौदा दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आत्तापर्यंत या प्रकरणी एकूण ३७ संशयित आरोपी निष्पन्न करण्यात पोलिसांना यश आले आहे . दरम्यान याप्रकरणी आत्तापर्यंत अटक झालेल्या संशयित आरोपींची संख्या १९ झाली असून, अजून १८ जण फरार आहेत. १४ फेब्रुवारी रोजी पहिल्यांदा हे रॅकेट उघडकीस आले होते त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा पोलिसांनी अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनपूर्वक तपास करत असून एकूण ३७ आरोपी निष्पन्न केले आहेत. त्यामध्ये आत्तापर्यंत एकूण १९ जणांना अटक



करण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील दोषारोपपत्रही न्यायालयात सादर करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक रितू खोकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख व तामलवाडीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर हे पुढील तपास करत आहेत.

## अवकाळीचा तडाखा, तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत द्या

### खासदार ओमराजे यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

आरंभ मराठी | धाराशिव

मान्सूनपूर्व पावसाने, वादळी वाऱ्याने कहर केला असून, पपई, कलिंगड, खरबूज, रब्बी कांदा, आंबा, डाळींब अशा बहुमूल्य फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने मदत द्यावी, अशी सूचना खासदार ओमराजे निंबाळकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे. खासदार ओमराजे यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये पाणी साचल्यामुळे उत्पादनावर प्रतिकूल



परिणाम झाला आहे. विजेचा फटका बसून काही शेतकऱ्यांची जनावरे दगावली असल्याच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. याशिवाय अनेक घरांवरील पत्रे वादळी वाऱ्यामुळे उडून गेल्याच्या तक्रारीही प्राप्त आहेत. अनेक कुटुंबे उघड्यावर आली असून, त्यांच्या निवाऱ्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## अवकाळी पावसाने नुकसान: शेतकऱ्यांना मदतीची मागणी

आरंभ मराठी | धाराशिव

अवकाळी पावसामुळे धाराशिव तालुक्यातील अनसुर्डा व परिसरातील सर्व गावात शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून, गेल्या १५ दिवसापासून पावसाने अक्षरशः धुमाकुळ घातला आहे. या पावसाने अनेक घरांचीही पडझड झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तसेच घरांचे नुकसान झालेल्या नागरिकांना मदत द्यावी, अशी मागणी शिवसेनेचे (उबाठा गट) पांडुरंग माने यांनी केली आहे. माने यांनी म्हटले आहे की, परिसरात प्रचंड मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस पडत असून, त्यामुळे फळबागा,भाजीपाला शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच अनेकांची घरे बाधित झाली असून, शेतातील बांध फुटुन माती वाहुन गेली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने दखल घेऊन तत्काळ मदत करावी. तसेच मदत व पुनर्वसन विभागाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करावी.

## जिल्ह्यात ११ जूनपर्यंत जमावबंदी आणि शस्त्रबंदी आदेश लागू

आरंभ मराठी | धाराशिव

आगामी सण, उत्सव, धार्मिक कार्यक्रम व विविध आंदोलने यांचा विचार करता, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निमर्ण होण्याची शक्यता असल्याने जिल्ह्यात २९ मे २०२५ रोजी ००:०१ वाजेपासून ते ११ जून २०२५ रोजी २४:०० वाजेपर्यंत जमावबंदी आणि शस्त्रबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. हा आदेश महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार लागू करण्यात आला आहे.महाराणा प्रताप जयंती (२९ मे), राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती (३१ मे), शिवराज्याभिषेक सोहळा (६ व ७ जून), तसेच बकरी ईद (९ जून) हे सण व उत्सव शांततेत पार पडावेत, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. शिवाय मराठा आरक्षण,ओबीसी आरक्षण,वक्फ कायदा विरोध,शेतकरी आंदोलने, पिकविमा व नुकसान भरपाई संदर्भातील मागण्या यावरून आंदोलनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर अपर जिल्हादंडाधिकारी शोभा जाधव यांनी या काळात जिल्ह्यात पुढील गोष्टींवर बंदी घातली आहे. कोणत्याही प्रकारचे शस्त्र,सोटे,तलवार, बंदूक,लाठ्या,दगड किंवा इजा करणाऱ्या वस्तू बाळगणे,स्फोटके,दाहक पदार्थ,किंवा फेकण्यायोग्य साधने जवळ ठेवणे,आवेशी भाषणे,विडंबनात्म कृती,संविधानविरोधी घोषणा,चित्रफलक,असभ्य वर्तन किंवा सामाजिक सलोखा बिघडवणारी कृती करणे,पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव,मोर्चा,मिरवणूक काढणे यास प्रतिबंध राहील. या आदेशाची अंमलबजावणी शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांवर लागू होणार नाही. तसेच धार्मिक,सामाजिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी संबंधितांनी पोलिसांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. जिल्ह्यात सण, यात्रा, जत्रा आणि उरूस या काळात शांततेत साजरे व्हावेत तसेच संभाव्य आंदोलनांमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये,याकरिता प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करून शांतता आणि सुव्यवस्था राखावी,असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## शाळेशेजारील झाडावरच्या विद्युत तारांचा धोका

आरंभ मराठी | जवळा

उन्हाळा सुट्टी लागल्यानंतर कोणीही शिक्षक वा शिपाई शाळेवर फिरकले नसताना शाळेतील स्वच्छता ही विद्यार्थ्यांनाच करावी लागते. भूम तालुक्यातील माणकेश्वर येथील जि प प्रशालेत नवीन विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असताना विद्यार्थ्यांना शाळेच्या स्वच्छतेकडे जास्त लक्ष द्यावे लागणार आहे .अशाच प्रकारे माणकेश्वर येथील जि प प्रशालेतील वर्गाशेजारील झाडांमधून विद्युत तारा गेल्याने विद्यार्थ्यासमोर धोक्याची घंटा दिसून येत आहे. अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी नवीन प्रवेश शाळेत घेतले असताना त्यांचा स्वच्छतेकडे भर असल्यामुळे या झाडांमधून गेलेल्या विद्युत तारेमुळे दुर्घटना नाकारता येत नाही. यामुळे संबंधित शिक्षकासह शालेय समिती अध्यक्षांनी महावितरणला निवेदन देऊन विद्युत खांब शाळेच्या बाहेरून घेण्याची मागणी ग्रामस्थासह विद्यार्थ्यांचे पालक करीत आहेत.

# बोगस खते आणि बियाणे विक्रीवर कृषी विभागाची करडी नजर

### जिल्ह्यात नऊ पथके तैनात

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात सर्वदूर मान्सून पूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे आता खरीप हंगामाला सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचा कृषी विभाग सज्ज झाला आहे. या काळात बनावट बियाणे, अवैध आणि विनापरवाना खते, जादा दराने खते, बियाण्यांची विक्री करणाऱ्यांवर थेट कारवाई करण्यासाठी कृषी विभागाने तालुकानिहाय पथकांची नियुक्ती केली आहे. नियुक्ती करण्यात आलेल्या पथकातील सदस्यांची नावे, संपर्क क्रमांक असलेला फलक दुकानात दर्शनी भागात लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्ह्यात खरीप हंगामाला टप्याटप्प्याने सुरुवात झाली आहे. मशागतीची कामेही काही भागात सुरू झाली आहेत. मान्सूनपूर्व आणि मान्सून यामध्ये अंतर राहणार नसल्यामुळे पेरणी व लागवडीची तयारी सुरू झाली आहे. यंदा जिल्ह्यात खरिपाचे साडे सहा लाख हेक्टर क्षेत्र निर्धारित केले आहे. त्यात सोयाबीनचे सर्वाधिक क्षेत्र असणार आहे. त्यादृष्टीने बियाणांचा पुरवठा करण्याचे नियोजन सुरू आहे. मात्र, रासायनिक खतांचा तुटवडा जाणवण्याची शक्यता आहे, यातयुरिया व डीएपी



या दोन खतांचा सध्या तुटवडा आहे. तसेच कंपन्यांकडून खतांची लिंकिंग होण्याची शक्यता असते. रासायनिक खतांचे लिंकिंग करून शेतकऱ्यांना अनावश्यक खते खरेदीसाठी भाग पाडण्यास शासनाने बंदी घातली आहे. त्यानुसार कृषी विभागाने प्रत्येक तालुक्यात पथक तैनात केले आहे. त्यात समाविष्ट अधिकारी–कर्मचाऱ्यांचे मोबाइल क्रमांक कृषिनिविष्ठा विक्रेत्यांना देण्यात येतील. त्यांनी दर्शनी भागात हे क्रमांक प्रसिद्ध करायचे आहेत. त्यावर शेतकरी आपली तक्रार नोंदवू शकतील, असे कृषी विभागातर्फे सांगण्यात आले.

## गांजाचे सेवन करणारा तरुण ताब्यात

आरंभ मराठी | कळंब

अवैधपणे गांजाचे सेवन करणाऱ्या तरुणाला कळंब पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्यावर कारवाई केली. आरोपी कुणाल मनोहर माने (वय २३ वर्षे, रा. इंदीरानगर, कळंब) याला दिनांक २८ मे रोजी सायंकाळी इंदीरानगर कळंब येथे गुंगीकारक गांजा पदार्थ चिलीम मध्ये भरुन ओढत असताना कळंब पोलीसांनी ताब्यात घेतले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन त्याच्याविरुध्द एन.डी.पी.एस अफक्ट १९८५ कलम ८ (सी), २७ अन्वये कळंब पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

## नॅशनल अँटी करप्शन अँड क्राइम कंट्रोल ब्युरोच्या प्रदेशाध्यक्षपदी राजवर्धन खोत

आरंभ मराठी | कोल्हापूर

नॅशनल अँटी करप्शन अँड क्राइम कंट्रोल ब्युरोच्या प्रदेशाध्यक्षपदी राजवर्धन खोत यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत उपाध्याय यांनी केली आहे. खोत यांच्या निवडीबद्दल अभिनंदन होत आहे.राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी आणि गुन्हेगारी नियंत्रण ब्युरो ही नीती आयोग (भारत सरकार) अंतर्गत नोंदणीकृत असलेली संस्था असून, राजवर्धन महादेव खोत यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची संघटनेच्या राष्ट्रीय समितीने महाराष्ट्र राज्य अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.संघटनेचे उपाध्याय यांनी म्हटले आहे की, नॅशनल अँटी करप्शन अँड क्राइम कंट्रोल ब्युरो ही संघटना सर्व सरकारी संस्थांसोबत सहाय्यक म्हणून काम करत असून,खोत यांच्या माध्यमातून या कामाला आणखी बळ मिळेल.



खोत यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com


संपादकीय

शुक्रवार दि.30 मे 2025

# शिक्षण गंगेचा भगीरथ: कर्मवीर मामासाहेब जगदाळे

''हजारों साल नर्गिस ,
अपनी बे-नुरी पे रोती है,
बडी मुश्किल से होता है,
चमन में दिदा-वर पैदा। ''

प्रस्तुत शेर कर्मवीरांच्या जीवन चरित्राला तंतोतंत सुसंगत होतो. साधारण शेतकऱ्याच्या घरामध्ये गोविंदराव व मुक्ताबाई यांच्या पोटी ४ फेब्रुवारी १९०३ मध्ये कर्मवीरांचा जन्म झाला.कर्मवीरांचे जन्म नाव निवृत्ती असे ठेवण्यात आले.भौगोलिक रूपाने मामांचे गाव धाराशिव व सोलापूरच्या सीमावर्ती भाग येरमाळा गावाच्या शेजारी चारा या गावी झाला. वास्तविक पाहता धाराशिव जिल्हा निजाम राजवटीत तर सोलापूर हा जिल्हा ब्रिटिश राजवटीत होते. त्यामुळे दोन्ही राजवटीपासून दुर्लक्षित असे चारा गाव होते.तसेच कर्मवीरांच्या घरी शिक्षणाचा गंध नसताना देखील.गावामध्ये तिसरीपर्यंत शिक्षण घेऊन, ते पुढील शिक्षणासाठी बार्शीला आले. दुसरीकडे घरची परिस्थिती बेताची असल्याकारणाने त्यांना पाहुण्याकडे जेवणाची व्यवस्था करावी लागली.असेच कसेबसे दिवस काढत कर्मवीरांनी १९२३ ला सातवी व इंग्रजी माध्यमातून मॅट्रिक परीक्षा १९३० साली उत्तीर्ण केली. सन् १९३१ मध्ये कर्मवीरांनी 'सोलापूर कॉपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियनचे सुपरवायझर' म्हणून तर पुढे बार्शी नगरपालिकेत विविध पदावर काम केले.परंतु नगरपालिकेत काम करत असताना त्यांच्या इमानदारी व वास्तववादी जीवन पद्धतीमुळे अनेक पदाधिकाऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले आणि तेथे काम करत असताना त्यांना बहुजन समाजावर होत असलेल्या अन्यायाची जाण झाली. तसेच नगरपालिकेच्या माध्यमातून उच्चभ्रू जातीतील अनेक वस्तीगृहाला दिले जाणारे अनुदान व त्यातील भ्रष्टाचार त्यांच्या लक्षात आला. त्यामुळे बहुजन समाजाच्या विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता त्यांच्या लक्षात आली. त्यामुळे त्यांनी १९३४ मध्ये बार्शी येथे श्री शिवाजी बोर्डिंग ची स्थापना केली. बोर्डिंगच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांवर श्रम ,राष्ट्रप्रेम,



समाज, आचरण व नैतिकता आदी तत्त्वांचे संस्कार मुलांना देण्यास सुरुवात केली. त्याच बरोबर राष्ट्रप्रेम वाढीसाठी स्वातंत्र चळवळीमध्ये काम करणारे प्रति सरकारचे संघटक क्रांतिसिंह नाना पाटील यांसारख्या क्रांतिकारकांच्या बोर्डिंगला दिल्या जाणाऱ्या भेटी मधून राष्ट्रप्रेमाचे धडे विद्यार्थ्यांना मिळाले . तर दुसरीकडे महान समाजसेवक संत गाडगे महाराजांच्या कीर्तनामुळे समाजवादाचे बीज खोलवर पेरले गेले. शिक्षण विस्ताराचे महान कार्य करत असताना कर्मवीरांना अनेक संकटाचा सामना करावा लागला.त्याम ध्ये प्रामुख्याने प्रस्थापित गावगुंडांचा त्रास देखील त्यांना झाला परंतु न घाबरता मामांनी मोठ्या हिमतीने त्यांच्यावर विजय मिळवला. तसेच बहुजन समाजातील गोरगरिबांची लेकरे बोर्डिंग मध्ये सांभाळताना त्यांना अनेक आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागला. त्याच्यावर मात करण्यासाठी त्यांनी गावोगावी फिरून बहुजनातील विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या पाठीवर दारो-दारी जाऊन धान्य गोळा केले आणि नेमक्या त्याच गोष्टीच्या माध्यमातून कर्मवीर माम ासाहेब जगदाळे जनसामान्यांमध्ये शिक्षणाचे भगीरथ म्हणून लोकप्रिय झाले.आणि बहुजन समाजातील गोरगरिबांच्या मदतीने पुढे श्री शिवाजी बोर्डिंगचे रूपांतरण श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी मध्ये झाले. अशा महामानवाचे देहावसान ३० मे १९८१ रोजी झाले. आज ह्या वटवृक्षाला कॉलेजेस, शाळा,कृषी महाविद्यालय, विधी महाविद्यालय, हॉस्पिटल आदी मिळून जवळजवळ ५० शाखेचा विस्तार झालेला आहे. म्हणून तुकाराम महाराजांच्या शब्दात म्हणावे वाटते की,

''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे येत्न करू।। १ ।।
शब्दाची आमच्या जीवाचे जीवन ।
शब्द वाटू धन जनलोका ।। २ ।।
तुका म्हणे पहा शब्द चिहा देव ।
शब्दाची गौरव पूजा करू ।। ३ ।।



प्रा. अशोक चंद्रकांत पाटील,
कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी
मो.९५६१८७९६५७

# भौतिकतेच्या झगमगाटात हरवलेली नैतिकता

पुण्यातील एका उच्चभ्रू कुटुंबातील हुंडाबळीच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. या घटनेवर अनेक बाजूंनी विचार मांडले गेले. जागतिकीकरणानंतर आर्थिक समृद्धी आली, पण वैचारिक आणि सामाजिक पीछेहाट झाल्याचे दिसून आले. औद्योगिक पट्ट्यांमध्ये जमिनीचे भाव गगनाला भिडले, पण माणसाचे विचार आणि मानसिकता मात्र पाताळात शिरू लागली. राहणीमान उंचावले, विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर वाढला, पण मध्ययुगीन कालखंडातील विचारसरणी पुन्हा नव्या रूपात अवतरू लागली. हुंडा प्रथा, स्त्रीभ्रूणहत्या, जातीय व धार्मिक कट्टरता, नरबळी, जादूटोणा, भोंदूगिरी, दैववाद यांसारख्या अंधश्रद्धा नव्या पिढीत पुन्हा डोके वर काढताना दिसत आहेत.भौतिक प्रगती, चैनशौकीन जीवनशैली आणि त्याचे सोशल मीडियावर होणारे रिल्स आणि व्हिडिओद्वारे प्रदर्शन पाहिले की, एकूण समाजाची दिशा चुकते आहे का? असा प्रश्न अनेकांना पडतो. पुरुषांच्या गळ्यातील मोठमोठाल्या सोन्याच्या साखळ्या, लाखो-कोट्यवधींच्या गाड्या, आलिशान हॉटेलमधील खाणेपिणे, सेलिब्रिटी व राजकीय व्यक्तींशी उठबस, या साऱ्यांनी तरुणाईला मोहिनी घातली आहे. ''प्रचंड श्रीमंतच झालं पाहिजे!'' या अट्टाहासापायी अनेकजण वाट्टेल ते करून पैसा मिळवण्याच्या मागे लागले आहेत. जगण्याचा दर्जा कितीही घसरला तरी चालेल,



पण स्टेटस मात्र खोटं का होईना उंच असायला हवं, अशी मानसिकता निर्माण झाली आहे.या खोट्या प्रतिष्ठेचे सोशल मीडियावर मोठ्या दिमाखात प्रदर्शन केले जाते. हे पाहून अनेकांना वाटते की समाजाची नीतिमत्ता रसातळाला जाणार तर नाही ना...? जागतिकीकरणानंतर समाजजीवन झपाट्याने बदलले. विलासी जीवन जगण्यासाठी अनेक वस्तू, सेवा आणि प्रलोभने बाजारात आली. गॉगल, घड्याळ, मोबाईल, कार या वस्तू अमुक कंपनीच्या असल्या की त्या व्यक्तीबद्दल एक 'इम्प्रेशन' तयार होऊ लागले. त्याच्याकडे विचार नसले तरी त्याच्या पेहेरावाने तो लोकांना भुरळ घालतो, ही दुर्दैवी स्थिती निर्माण झाली आहे.शिक्षणातून फक्त गुण मिळू लागले; त्या गुणांमधून व्यावसायिक शिक्षण व नोकऱ्या मिळू लागल्या. सुशिक्षित, नवश्रीमंत मध्यमवर्ग पुन्हा जुन्या नाकारलेल्या परंपरांकडे झुकताना दिसू लागला.अशा काळात नैतिकतेचे शिक्षण, समाजातील समतोल राखण्यासाठी प्रबोधन, आणि मानवतावाद जपणाऱ्या चळवळी पुन्हा एकदा बळकट करणे आवश्यक ठरते. शहरांची अनियंत्रित वाढ, गुन्हेगारी, भ्रष्ट व्यवस्था, अनधिकृत बांधकामे या नागरी सम स्या सोडवणं अत्यावश्यक आहे. शिक्षणामार्फत वैज्ञानिक दृष्टिकोन, लैंगिक समानता, आणि सामाजिक सुसंवाद निर्माण करून नव्या पिढीने समाजातील विसंगती दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भौतिक सुखापेक्षा शाश्वत समाधान आणि आनंद देणाऱ्या विचारांचे प्राबल्य वाढले पाहिजे. विविध सण, उत्सव, विवाह समारंभ, वाढदिवस यांसारख्या प्रसंगांतून होणारे संपत्तीचे अतिप्रदर्शन थांबवले पाहिजे. तरुणांच्या समोरील वैचारिक गोंधळ दूर झाला पाहिजे. खोटे संकेत, मिथके यांचा पर्दाफाश झाला पाहिजे.सामाजिक व सांस्कृतिक अध:पतन थांबवण्यासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे. यासाठी वाचन चळवळ उभारली गेली पाहिजे. आपल्या देशाला बिल्डर, उद्योगपती असे श्रीमंत लोक हवे आहेत पण ते सारे विवेकबुद्ध जपणारे असतील तरच त्यांच्या श्रीमंतीचा सम ाजाला फायदा होईल. शेवटी,शिक्षण आणि प्रबोधनाचा झंझावात विचारवंत, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी व शिक्षक-प्राध्यापक यांनी निर्माण केला पाहिजे.सम ाजाला सावरण्याची हीच योग्य वेळ आहे!



किशोर जाधव,
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

## विवाह सोहळा

लग्न म्हटले की खर्च वारेमाप
वधूच्या पित्याला लागते धाप
बँडबाजा,डिजे,साऊंड,फटाके
मान्यवरांच्या
सत्कारालाफेटे

शुभमुहूर्त,मंगलाष्टके,लग्नविधी
वाजंत्री,गायक आणि भटजी
यांच्या शिवाय लग्न लागत
नाही
खर्चाशिवाय लग्नाला शोभा
नाही

डेकोरेशनची ती भन्नाट
सजावट
करवल्यांची असते नुसती
वटवट
वऱ्हाडी मंडळी हळूहळू जमते
लग्नघटिका जवळ हो येते

नवरा नवरी मिळून स्टेजवर
जातात
टपोरी पोरं चिक्कार गर्दी
करतात
धान्यरुपी अक्षता वाटप
करतात
भटजी लगेच मंगलाष्टका
गातात

लग्न लागते,फटाके फोडतात
वऱ्हाडी मंडळी जेवायला
बसतात
मट्ठा,थंड पाणी पिऊन तृप्त
होतात
अन्न शिल्लक ठेवून तसेच
उठतात
विवाह सोहळा असावा नेटका
झगमगाट कमी खर्च मोजका
भोजनाचे पदार्थ संख्येने कमी
रूचकर जेवण प्यायला पाणी

डेकोरेशनची गरज नसावी
डीजे आवाजाला बगल द्यावी
लग्न लागताच फटाके नको
सत्काराचे सोंग अजिबात नको

वेळेवर लग्न लावायचे असते
नाचणाऱ्यांनी उगी नाचायचे
नसते
लग्न लागताना शांत बसावे
वधूवरांना शुभ आशीर्वाद द्यावे

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट
ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# वात्सल्याचा वाहे झरा, हृदयात तुझ्या आई, गुन्हा असा मी काय केला, जीव नकोसा होई..?

आरंभ मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार. काव्यारंभ हे सतरावे पुष्प मी अगदी बालपणापासून शारीरिक अपंगत्वाबरोबर लढा देत प्रवाहाविरुद्ध पोहत त्यावर मात करणाऱ्या व अंगणवाडी शिक्षिका म्हणून यशस्वी कारकीर्द करणाऱ्या कांचनगंगा मुरलीधर मोरे यांच्या सुंदर कविता व गझलांनी गुंफणार आहे. कांचनगंगा यांचे शिक्षण एम. ए. बी.एड.झालेले आहे.

त्यांना गझल, कविता, कथा, वैचारिक लेख लिहायला व वाचायला आवडतात. त्यांचा क्षितीजापार हा कविता संग्रह प्रसिद्ध आहे तसेच सावित्रीच्या कविता या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात तसेच अनेक वृत्तपत्रात त्यांचे लेखन प्रकाशित आहे. धाराशिव व उदगीर येथील अखिल भारतीय साहित्य संमेलनात निमंत्रित म्हणून त्यांचा सहभाग होता.

कवयित्री कांचनगंगा यांनी आईच्या कडेवरून शाळेत जाऊन दहावीपर्यंत शिक्षण घेतले, १२ वी नंतर डॉंक्टरांच्या सल्ल्याने कुबड्यांच्या मदतीने चालायल्या लागल्या आणि त्यांना पंख मिळाल्या सारखेच वाटले. संधी मिळताच त्या अंगणवाडी कार्यकर्ती या पदावर रुजु झाल्या, पुढे त्यांची भेट कोल्हापूर येथील स्वतः दिव्यांग असून दिव्यांगांसाठी समर्पित जीवन जगणाऱ्या मा. नसीमा हुरजूक यांच्याशी झाली आणि त्यांच्या आयुष्याला दिशा मिळाली.त्यांनी पण स्वतः च्या अपंगत्वाशी झुंज देत दिव्यांग बांधवांच्या सेवेसाठी जीवन समर्पित करण्याचा निश्चय केला. आणि मनात वाहणारा काव्यमय शब्दांचा झरा गझल व कवितांच्या रूपाने या खडतर वाटेवर त्यांच्या जीवनात समाधानाची हिरवळ निर्माण करतोय!

आता त्यांची हीच जिद्द लढण्याची ही कविताच पहा ना!त्या म्हणतात,

देह अपंग मन अपंग
जिद्द ठेवू लढण्याची
धडपडणारे जीवन आमुचे
मनात उर्मी घडण्याची !

जीवनाबद्दल किती सकारात्मक दृष्टीकोन आहे! किंवा त्यांच्या गझलेतील

दहा दिशांना शोधत होते प्रकाशवाटा
प्राक्तनातल्या अंधाराला उजळत गेले

या ओळी वाचल्या तर जीवनात संकटं आली तरी त्यावर मात करण्याची कवयित्रीची जीवनदृष्टी बघायला मिळते.

तर एका काटेरी मार्ग या कवितेत

चंदेरी मज भासतो
काटेरी हा मार्ग जरी
चैतन्य दीप चेतवूनी
पेरतो चांदणे उरी

हा टोकाचा आशावाद आहे.

तर सांजवात लावताना या तर खूप मोठा विषय चार ओळीत कवयित्रीने मांडला आहे, त्या म्हणतात,

पसायदान हे ज्ञानेशांचे
आज पुन्हा या ओठी यावे
विरून जाता मी पण माझे
या देहाचे चंदन व्हावे!

तर अशा या नितांत सुंदर गझल व कवितांचा आपण आस्वाद घेऊया.



डॉ. रेखा अनिल ढगे

काव्यारंभ

### का जीव नकोसा...?

वात्सल्याचा वाहे झरा
हृदयात तुझ्या आई
गुन्हा असा मी काय केला
हा जीव नकोसा बाई...?

सजवीन अंगण सारे
चिमुकल्या पावलांनी
मिटल्या स्वप्नकळ्याही
मग येतील तुझ्या फुलोनी...

हाक मारू दे आई म्हणूनी
नकोच दुसरे काही
अखंड नात्यांचे हे वस्त्र
का क्षणात विरुनी जाई...

आर्त हाक येता ओठी
हृदय उचंबळोनी येई
मांडीवरती बसूनी तुझ्या
ऐकूदे तुझी अंगाई...

काही दिवसांची मी पाहुणी
अजन्म राहीन ऋणी
ऋतुचे पाहू दे सोहळे
कृतार्थ होईन मी जीवनी...

### मात्रा वृत – अनलज्वाला
### मात्रा – ८ +८ +८

आयुष्याची हिरवी पाने चाळत
गेले
हवेहवेसे हळवे क्षण मी वेचत गेले

दहा दिशांना शोधत होते
प्रकाशवाटा
प्राक्तनातल्या अंधाराला उजळत
गेले

भिववत होती संध्या छाया
मावळतीची
दुर आशेच्या शुक्रतारका शोधत
गेले

कधी एकटी गर्दीमध्ये घाबरले ही
जीर्ण बेगडी नाती सारी पेलत गेले

क्षणभंगुर हे जीवन आहे कळले
जेंव्हा
प्राजक्तासम नित्य नव्याने उमलत
गेले

### सांजवात लावताना...

सांजवात ही
लावताना
तृप्तीचे मी गीत गावे
गहिवरलेल्या
माणुसकीतून
दुःखीतांचे अश्रू
पुसावे
सेवाभाव हा मनी
जागता
या देहाचे चंदन
व्हावे...

कैवल्याचे धवल
चांदणे
मनांगणी या
शिंपडावे
शितल सौम्य
प्रकाशात त्या
रोम रोम हे
पुलकित व्हावे
षडवीकारास दूर
सारता
या देहाचे चंदन
व्हावे...

प्राजक्त सडा
गंधलेला
मुग्ध उषेने
गंधाळावे
क्षणभंगूर त्या
दवमोत्यांनी
अनमोल क्षण हे
उरी जपावे
सत्कर्माचे गुंफीत
मोती
या देहाचे चंदन
व्हावे...

विखूरलेल्या
आठवानी
आसवमोती
ओघळावे
निर्माल्य फुलांच्या
पाकळ्यांनी
संस्कार सुगंधे
दरवळावे
माणूसकीची
रुजवण करता
या देहाचे चंदन
व्हावे....

पसायदान हे
ज्ञानेशांचे
आज पुन्हा या
ओठी यावे
आर्त भक्तीच्या
लाघवाने
तुझे रुप या
चित्ती ठसावे
विरुनी जाता मी
पण माझे
या देहाचे चंदन
व्हावे...

### काटेरी मार्ग ...

चंदेरी मज भासतो
काटेरी हा मार्ग जरी
चैतन्य दिप चेतवूनी
पेरतो चांदणे उरी ...

तडे मनाचे लिंपताना
साक्ष सुखाची प्रांजळ
पुष्प सुगंधे घमघमते
समृद्धीची ओंजळ...

खडकाळ हे रान जरी
हिरवळले कोंब सारे
टिपून घ्यावे क्षण क्षण
सुगंधाने दरवळणारे...

शिशिरवेडी पानगळ
किणकिणते हळुवार कानी
सुरवेड्या बासरीची
गुंजते धून अलवार मनी ...

घाव सारे प्राक्तनाचे
शिंपल्यात बंद व्हावे
विश्वात्मक भाव होऊन
चंदनी सुख दरवळावे...

कांचनगंगा मोरे
काक्रंबाता.तुळजापूर

### जिद्द लढण्याची

देह अपंग मन अभंग
जिद्द ठेऊ लढण्याची
धडपडणारे जीवन आमुचे
मनात उर्मी घडण्याची...

कणी टाळावे कोणी पाळावे
अंत इथे माणूसकीचा
कवेत घेऊन अपूर्णतेला
प्रवास सारा जिद्दीचा...

साथ सोडता पानांनी
पंख फुटे पाखरा
सांगून जाते वसंत पालवी
जीवनाचा या अर्थ खरा...

वेदनेच्या भाळावरती
नियतीने जे क्षण गोंदले
त्या क्षणांच्या सहवासातून
जीवन आमुचे आम्ही सांधले...

चैतन्याचे दिप सारे
जिद्दीने तेवत ठेऊ
विसरून जाण्या वेदनेला
आनंदाचे गीत गाऊ...



कांचनगंगा मोरे
काक्रंबा,तुळजापूर

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार वितरण, शिक्षक मेळावा रविवारी

आरंभ मराठी | कोल्हापूर

एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शनिवार, ३१ मे रोजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार, शिक्षक म ेळाव्याचे आयोजन केल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष बापूसाहेब आडसूळ यांनी दिली.लोटस हॉल छत्रपती शाहू मार्केट यार्ड रेल्वे गुडस शेजारी कोल्हापूर येथे सकाळी दहा वाजता कार्यक्रम होईल. राज्याचे आरोग्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांचे हस्ते आणि राज्य नियोजन महामंडळाचे कार्याध्यक्ष आमदार राजेश क्षीरसागर, खासदार धैर्यशील माने, आमदार चंद्रदीप नरके, शिवसेना वैद्यकीय कक्षाचे राज्याचे प्रमुख आरोग्यदूत मंगेश चिवटे, प्रशांत साळुंखे (शिवसेना वैद्यकीय कक्ष पश्चिम महाराष्ट्र प्रमुख) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार व संस्थाचालक- शिक्षक म ेळावा घेण्यात येणार असल्याचे एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बापूसाहेब आडसूळ यांनी सांगितले.कार्यक्रमप्रसंगी राज्यातील ५० आदर्श संस्थांना पुरस्कार देऊन सन्मानित येणार आहे. यावेळी राज्यभरातून दोन हजार संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित राहणार आहेत.

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संमिश्र
शुक्रवार दि.30 मे 2025

# दिल्लीतील राष्ट्रीय स्पर्धेत मुरूम गुरुकुल शाळेचा झेंडा फडकला

## ११ विद्यार्थ्यांची २० पदकांवर मोहोर; मुरूममध्ये विजेत्यांचा सत्कार सोहळा उत्साहात







आरंभ मराठी | मुरुम

दिल्ली येथे पार पडलेल्या दुसऱ्या नॅशनल इनडोअर मार्शल आर्ट गेम्स व पहिल्या लाठी फेडरेशन कप या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत मुरुम येथील गुरुकुल प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग कामगिरी करत शाळेच्या नावे फर्स्ट चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावली. यानिमित्त दिल्लीहून परतल्यानंतर शहरात विजयी विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. स्पर्धेत गुरुकुल शाळेच्या एकूण ११ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यापैकी विद्यार्थ्यांनी ९ सुवर्ण, ५ रौप्य आणि ६ कांस्य अशी एकूण २० पदके पटकावली. त्यांच्या या यशामुळे मुरुमसह संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे नाव उज्वल झाले आहे.पदक विजेते खेळाडू ज्यात देवांस चिलोबा २ सुवर्ण, २ कांस्य, राजवीर चौधरी १ सुवर्ण, २ कांस्य, समर्थ बायस १ सुवर्ण, २ कांस्य, लाव्या वाघमारे २ सुवर्ण, प्रत्युषा सोमवंशी १ रौप्य, आरोही पटवारी १ रौप्य, प्रियल राठोड १ सुवर्ण, १ कांस्य, गणेश पाटील १ सुवर्ण, १ कांस्य, स्वरा पाटील १ रौप्य, ईश्वरी चिलोबा १ सुवर्ण यांनी पदके जिंकले. या स्पर्धेत महाराष्ट्रातील रायगड, पुणे, रत्नागिरी, नाशिक, मुंबई, ठाणे, धुळे आणि धाराशिव जिल्ह्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. धाराशिव जिल्ह्यातून एकूण ३२ खेळाडूंनी भाग घेतला असून, त्यापैकी ११ खेळाडू हे गुरुकुल शाळेचे होते. त्यांच्या सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम शहरातील कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या निमित्ताने सत्कार समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रवीण स्वामी, श्रीकांत मिनियार, माजी प्रा. दत्ता इंगळे, राजेंद्र वाकडे, पद्माकर मोरे, विठ्ठल पाटील, दिलीप इंगोले, गोविंद इंगोले, नारायण शिंदे, अजित शिंदे, अजित चौधरी, अमोल पटवारी, विलास पाटील, जगदीश निंबरगे, वजीर शेख, विशाल व्हनाळे, दिवाकर पाटील व अमोल शिंदे यांची उपस्थिती लाभली.यावेळी श्रीकांत मिनियार यांनी मनोगत व्यक्त करताना दिल्लीत शहरातील विद्यार्थ्यांनी केलेली कामगिरी ही शहरवासीयांच्या शिरपेचात मानाचा तुरा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांचे प्रचंड कौतुक करून त्यांना पुढील वाटचालींकरिता सदिच्छा दिल्या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी यांनी मी आमदार म्हणून नव्हे तर एक विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून आपल्यासमोर आज मनोगत व्यक्त करत आहे असे सांगत आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांसह उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुरी चौधरी, प्रास्ताविक महमद रफी शेख यांनी तर आभार डॉ. प्रीती चिलोबा यांनी मानले. या यशामागे शाळेच्या शिक्षक व मार्गदर्शकांचा मोलाचा वाटा असून अपर्णा पोतदार, भाग्यश्री कुंभार, मालाश्री पाटील, भाग्यश्री पीचे, ऐश्वर्या रोले, रुपाली शिंदे, रियाज नूरसे, श्रीकांत भोज यांचे विशेष योगदान लाभले. या भव्य यशाबद्दल मुरूम शहरात आनंदाचे वातावरण असून, गुरुकुल शाळेचे विद्यार्थी भविष्यातही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली चमक दाखवतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# एमआयडीसीसाठी शेतकऱ्यांना २५ ते ३५ लाख मोबदला

## आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव



तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे औद्योगिक क्षेत्रासाठी (एमआयडीसी) संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यात समाधानकारक मावेजा मिळावा यासाठी पहिल्या दिवसापासून आपले प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांकडून संपादित केल्या जाणाऱ्या त्यांच्या जमिनीला साधारणपणे २५ ते ३५ लाख रुपये प्रति एकर मोबदला दिला जाण्याची प्राथमिक शक्यता आहे. जमिनी व्यतिरिक्त अन्य अनुषंगिक बाबींचा मोबदला स्वतंत्र असल्याचे महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन अर्थात 'मित्र'चे उपाध्यक्ष तथा तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. तामलवाडी औद्योगिक क्षेत्रात चार स्वतंत्र क्लस्टर उभारण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार टेक्स्टाइल, ॲग्रो प्रोसेसिंग, अनुसूचित जाती-जमातींसाठी आणि महिला उद्योजकांसाठी हे क्लस्टर उभारण्यात येणार आहेत. या क्लस्टरमध्ये धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक व नवोदित उद्योजकांना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. धाराशिव जिल्ह्यात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने हा महत्वपूर्ण प्रकल्प आपण हाती घेतला आहे. सोलापूर येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहात पार पडलेल्या उद्योजकांच्या बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील २०० हून अधिक उद्योजकांनी उपस्थिती लावली होती. गारमेंट व टेक्स्टाइलसह कृषिउत्पादन उद्योग क्षेत्रात गुंतवणुकीसाठी देखील एक विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यापूर्वीही या विषयावर २-३ वेळा बैठक घेण्यात आल्या असून त्यात या महत्वाच्या प्रकल्पाबाबत विस्तृत चर्चा झाल्या आहेत. या सर्व बैठकींना उद्योजकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

# तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या विरोधात अखिल भारतीय भष्ट्राचार निर्मुलन समितीचे ठिय्या आंदोलन

आरंभ मराठी | तुळजापूर




तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापूर येथील लेखापाल यांच्या २०१३ पासून आज पर्यंतच्या कामकाजाची चौकशी करून कारवाई करावी तसेच मंदिर संस्थानने ४७ कर्मचारी यांची भरती प्रक्रिया केली ज्यामध्ये १३ ते १५ पदे अचानक वाढवण्यात आली आहेत. संकेतस्थळावर कुठलीही माहिती न देता ही पदे वाढवण्यात आली आहेत. या वाढीव पदाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने गुरुवारी (दि.२९) जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांच्या वतीने तुळजाभवानी मंदिर संस्थान कार्यालय येथे ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये मंदिर संस्थान तुळजापूर यांच्या वतीने गणेश पाटील यांनी केलेल्या विविध मागण्या संदर्भात मुद्द्याच्या अनुषंगाने नियमानुसार उचित कारवाई करू अशा प्रकारचे लेखी पत्र तहसीलदार तथा व्यवस्थापक प्रशासन अरविंद बोळंगे यांनी जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांना दिल्यानंतर सदरचे आंदोलन स्थगित करण्यात आले. तात्पुरत्या स्वरूपात आंदोलन स्थगित करण्यात आले असून मागण्या न मान्य झाल्यास आत्मदहनासारखा पर्याय मार्ग अवलंबून लागेल असे जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांनी सांगितले आहे.

# हेक्टरी ५० हजारांची आर्थिक मदतीची इंडिया आघाडीची मागणी

आरंभ मराठी | कोल्हापूर



अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची तत्काळ आर्थिक मदत द्या, अशी मागणी इंडिया आघाडीच्या वतीने करण्यात आली.अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने, जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली.अवकाळी पावसामुळे कोल्हापूर जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत आणि नुकसानभरपाई देण्याची मागणी, इंडिया आघाडीच्या वतीने करण्यात आली. याबाबत खासदार शाहू महाराज आणि विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी अमोल येडगे यांची भेट घेतली.यावेळी मागण्यांचे निवेदनही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. कोल्हापूर जिल्ह्यात मे २०२५ मध्ये अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणावर शेतीसह इतर क्षेत्रांमध्ये नुकसान झाले.या पावसामुळे शेतमालाचे, घरे, जनावरे तसेच रस्ते आणि पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांचे उभे पीक वाया गेले असून, त्यांच्यावर आर्थिक संकट ओढावले आहे. अशा शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची तत्काळ आर्थिक मदत शासनाकडून देण्यात यावी. त्याचबरोबर राज्य शासनाने अवकाळी पावसाला राज्य विशेष नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षिक अनुदानाच्या दहा टक्केपर्यंत निधीचा वापर करून अशा आपत्तीमधील बाधित नागरिकांना तत्काळ मदत पुरविणे शक्य आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व बाधित क्षेत्राचे आणि इतर घटकांचे तत्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त नागरिकांना आर्थिक मदत द्या अशी मागणीही यावेळी करण्यात आली. दरम्यान, पत्रकारांशी बोलताना आमदार सतेज पाटील यांनी, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊनही मुख्यमंत्री शेतकऱ्यांशी कुठेही संवाद साधताना दिसत नाहीत. कृषिमंत्री शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत गेलेले नाहीत. केवळ राजकारणावर चर्चा होतात. विरोधी पक्ष म्हणून शेतकऱ्यांची भूमिका आम्ही मांडत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी खासदार शाहू महाराज यांनी पडझड झालेल्या घरांची त्याचबरोबर शेती पिकांचे तत्काळ पंचनामे करण्याची सूचना त्यांनी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांना केली. शिष्टमंडळामध्ये माजी आमदार राजूबाबा आवळे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल पाटील, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना उपनेते संजय पवार, सह संपर्कप्रमुख विजय देवणे, आर. के. पोवार, महादेवराव आडगुळे, दिलीप पवार, संदीप देसाई, सुनील मोदी, क्रांतिसिंह पवार, सतीशचंद्र कांबळे, चंद्रकांत यादव, अतुल दिघे, अनिल घाटगे, सुनील देसाई, बाजीराव पाटील त्यांच्यासह इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# एमपीएससी परीक्षेसाठी केंद्र परिसर १०० मीटरपर्यंत प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित

आरंभ मराठी | धाराशिव

येत्या रविवारी १ जून रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ साठी धाराशिव शहरातील विविध परीक्षा केंद्रांवर कडक सुरक्षा आणि शिस्तीच्या पार्श्वभूमीवर १०० मीटरचा परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव यांनी केली आहे. या आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात शांतता अबाधित राखण्याच्या दृष्टिकोनातून विविध निर्बंध लावण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रे खालीलप्रमाणे आहेत. श्रीपतराव भोसले हायस्कूल, पहिला मजला -२८८ उमेदवार,श्रीपतराव भोसले हायस्कुल,द्वितीय मजला ४३२ उमेदवार,श्रीपतराव भोसले ज्यु.कॉलेज ३८४ उमेदवार, श्रीपतराव भोसले हायस्कुल (आण्णा ई टेक्नो नवीन इमारत) ३१२ उमेदवार,रामकृष्ण परमहंस महाविद्यालय (नवीन व जुनी इमारत) २४० उमेदवार,छत्रपती शिवाजी हायस्कुल ३८४ उमेदवार, श्री.श्री.रविशंकर विद्यालय ३६० उमेदवार,तेरणा पब्लिक स्कूल ४३२ उमेदवार,रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,जुनी इमारत -२८८ असे एकूण ३१२० उमेदवार परीक्षा देणार आहे.प्रतिबंधात्मक आदेशांमध्ये खालील बाबी स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत.कोणत्याही प्रकारच्या घोषणा, आवाज किंवा गोंगाटास परवानगी नाही.शांततेस बाधा आणणाऱ्या व्यक्तींवर कारवाई केली जाईल. झेरॉक्स,पानपट्टी,टायपिंग सेंटर, इंटरनेट कॅफे,एसटीडी बुथ बंद ठेवावे लागतील. मोबाईल, इंटरनेट, फॅक्स, रेडिओ व तत्सम साधनांसह प्रवेश निषिद्ध राहील. परीक्षेशी संबंधित नसलेल्यांना प्रवेश नाकारण्यात येईल.कोणत्याही प्रकारचे वाहन परीक्षा केंद्राच्या आवारात येऊ शकणार नाही.५ पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येण्यास बंदी राहील.फक्त अधिकारी,कर्मचारी व परीक्षार्थींनाच प्रवेश मिळेल.हा आदेश फक्त १ जून २०२५ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत लागू राहणार आहे.या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार फौजदारी कारवाई केली जाणार आहे.

# लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांच्या जन्म दिनानिमित्त रक्तदान



आरंभ मराठी | मुरुड

ग्रामपंचायत कार्यालय मुरुड येथे गुरुवारी (दि.२९) लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामधे ५१ बॅग रक्त संकलित झाले. यावेळी उपसरपंच हणुमंत बापू नागटिळक, ग्रा.पं. सदस्य ॲड. श्रीकांत नाडे, लताताई भोसले, अनंत कणसे, सुरज सुर्यवंशी, तसेच नागनाथ बचाटे, विशाल नागटिळक, वैजीनाथ हराळे, आश्रुबा चव्हाण, दत्ता पोटभरे, रवि पुदाले, शुभम देवकर उपस्थित होते.

# आरळीच्या श्रीमंत कुस्ती आखाड्याचा तेजस लोहार बनला राज्यस्तरीय मॅट कुस्ती स्पर्धेचा चॅम्पीयन

आरंभ मराठी | तुळजापूर



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पै. महादेव गव्हार तालीम संघ येडशी आयोजित राज्यस्तरीय राजमाता चॅम्पीयन मॅट कुस्ती स्पर्धेत आरळी बुद्रुक श्रीमंत कुस्ती आखाड्याचा पैलवान तेजस लोहार चॅम्पीयन बनला. येडशी येथील राजमाता चॅम्पीयन किताबासाठी श्रीमंत कुस्ती आखाड्यात लढत करणारा आरळी बुद्रुक गावचा तेजस लोहार ढाक डावावर विजयी झाला. विजेत्या पैलवानास सन्मानाची गदा,११००० रुपये रोख ईनाम, सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. तेजर लोहार यांनी ७५ किलो वजन गटातून तर रोहित तोडकर यांनी ६५ किलो वजन गटातुन बाजी मारत श्रीमंत कुस्ती आखाड्याचे नाव रोशन केल्याबद्धल आरळी येथे श्रीमंत आखाडा व आरळी ग्रामस्थांच्या वतीने विजेत्या पैलवानांची जंगी मिरवणुक काढण्यात आली. त्यानंतर विजेत्या पैलवानांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी श्रीमंत कुस्ती आखाड्याचे संस्थापक संजय पारवे, सरपंच किरण व्हरकट,ॲड. सिद्राम पारवे,प्रभाकर उकरडे,वस्ताद राम पारवे, प्रविण व्हरकट,भास्कर पारवे,बजरंग कोकाटे,दादाराव पारवे,वस्ताद अजित भोसले,शिवानंद गवळी, युवराज पाटील,बाजीराव जाधव,सुनिल पारवे, विलास उकरंडे,अनिल जाधव,महादेव कचरे,किरण गायकवाड, बबलू पारवे,खंडू कचरे,विकास जोत आदी कुस्तीप्रेमी ग्रामस्थ उपस्थित होते. आरळी ग्रामस्थांनी कुस्ती क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करण्यासाठी सर्व पैलवानांचं कौतुक करत विजेत्या मल्लांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. येडशी येथे शरद गव्हार व अनिल अवधूत यांच्या मार्गदर्शनातुन राज्यस्तरीय मॅटवरील कुस्ती स्पर्धा नियोजनबद्ध संपन्न झाल्या, या स्पर्धेमध्ये विविध जिल्ह्यांचे २४३ पैलवानांनी सहभाग नोंदवला होता.

# शेतकऱ्यांना आता हक्काचा शेतरस्ता उपलब्ध होणार

## सातबारा उताऱ्यावर शेतरस्त्याची नोंद घेण्याच्या सूचना

आरंभ मराठी | धाराशिव

आपल्या शेतातून माल वाहतुकीसह रहदारी व्यवस्थित करता यावी, त्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये म्हणून शासनाने आता शेतकऱ्यांना ३ ते ४ मीटर रुंदीचे रस्ते उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी दिनांक २२ मे रोजी आदेश काढून महसूल विभागाला निर्देश दिले आहेत. त्यामुळे शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण असून, शेत रस्त्यासाठी होणारी भांडणे कमी होण्यास काही प्रमाणात मदत होणार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९९६ च्या कलम १४३ नुसार आणि १९०६ च्या कलम ५ नुसार भूधारकांना त्याच्या जमिनीचा वापर शेतीविषयकसह अनुवंशिक वापर करण्याचा हक्क प्रदान करते. त्यात पारंपरिक अरुंद पाऊलवाटा किंवा बैलगाडीमार्गे आता मोठ्या कृषी अवजारांसाठी कमी पडत आहे. त्यामध्ये ट्रॅक्टर, हार्वेस्टर, रोटा व्हेटरसह इतर अवजड वाहनांचा समावेश होतो. अशा प्रकारच्या वाहतुकीसाठी शेतमालाच्या जलद व सुरक्षित वाहनासाठी सध्याचे अरुंद रस्ते कमी पडतात. त्याचप्रमाणे रस्त्यावरून एकमेकांत वादही होतो. त्यासाठीच आता शासनाने या प्रकरणात विशेष लक्ष घातले आहे.



कोणत्याही रस्त्याविषयी वाद होऊ नये, शेतकऱ्यांची अडवणूक न होता रस्त्याची सोय व्हावी. अडथळा दूर करण्याचे काम शासनाने हाती घेतल्याच्या निर्णयाचे असंख्य शेतकऱ्यांत स्वागत होत आहे. शेत रस्त्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यावर ९० दिवसांच्या कालावधीत संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी त्या स्थळावर जाऊन शेतरस्त्याची पाहणी करावी. पारंपरिक अरुंद शेत रस्त्याऐवजी ३ ते ४ मीटर रुंदीचे रस्ते शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे आणि अशा रस्त्याची नोंद प्रत्यक्षात सातबारा उताऱ्यावर इतर हक्कात घेण्याचे स्पष्ट आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत,ळे रस्त्याविषयीचे वाद आता कमी होणार असल्याचे संकेत आहेत.

# माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी घेतली अशोकराव जवळगे यांची भेट



आरंभ मराठी | लोहारा

माजी मंत्री आणि सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांनी गुरुवारी (दि.२९) लोहारा तालुक्यातील धानोरी येथे दिपक अशोकराव जवळगे यांच्या घरी त्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये विविध विकास कामावर चर्चा झाली. यावेळी दिलीपराव देशमुख यांचे जवळगे कुटुंबाने स्वागत केले.

CMYK

04

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव....

शुक्रवार दि.30 मे 2025

# लोहारा तालुक्यातील हॉटेल आणि ढाब्यांवर सर्रास होतेय अवैध दारूविक्री

## धाराशिवच्या उत्पादन शुल्क विभागाकडून तसेच लोहारा पोलीस प्रशासनाकडून दुर्लक्ष

अभिजित साळुंके | आरंभ मराठी

लोहारा: दारूची अवैध विक्री करणे आणि दारू पिण्यास जागा उपलब्ध करून देणाऱ्यांविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई करण्यात येत आहे. याअंतर्गत जिल्ह्यातील अनेक ढाबा मालकांवर कारवाई करण्यात आली आली. जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांत विविध कारवाया करण्यात आल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सांगण्यात आले.

विनापरवाना दारू विक्री करू नये, दारूची अवैध वाहतूक करू नये, तसेच पिणाऱ्यांनीही परवाना असलेल्या बारमध्ये दारू प्राशन करावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क प्रशासनाकडून करण्यात येते.मात्र, तरीही अनेक ठिकाणी अवैध दारूची विक्री केली जाते. मद्यपीही मिळेल तिथून दारू विकत घेऊन पीत असतात. यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाकडून वेळोवेळी दंडात्मक कारवाई करण्यात येते. विनापरवाना दारू पिणारे, त्यांना जागा उपलब्ध करून देणाऱ्या ढाब्यांवरही कारवाई होते.



### पिणाऱ्यांनाही परवाना आवश्यक

मद्यविक्री करणाऱ्यांना परवाना आवश्यक असतो, तसा मद्य प्राशन करणाऱ्यांनाही बंधनकारक आहे. तपासणी दरम्यान विनापरवाना मद्य प्राशन करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. अवैध दारू विक्रीप्रकरणी नियमित कारवाई केली जाते. त्यामुळे परवाना घेऊनच मद्य प्राशन करावे. विनापरवाना अवैध दारू विकणारे आणि त्याची वाहतूक करणे, तसेच विनापरवाना दारू पिणे या विरोधात कारवाई करून मुद्देमाल जप्त केला जातो. चार महिन्यांत वाहने जप्त, तसेच वाहन किमतीव्यतिरिक्त लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तो दारूच्या किमतीपेक्षा अधिक आहे.

### गुन्हे दाखल करून अटक

अवैधपणे दारू विकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून अटक करण्यात येते. अनेकांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच पिण्यास बसणाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई झाली आहे. माहिती मिळाल्यानंतर आणि अचानक छापा टाकून राज्य उत्पादन पथकाकडून कारवाई केली जाते.

### ढाबा मालकांवरही कारवाई

जिल्ह्यात अवैध दारू विक्री करणे, वाहतूक करणे, तसेच विनापरवाना मद्य प्राशन करणाऱ्यांना जागा उपलब्ध करून देणाऱ्यांविरोधात सर्व तालुक्यांत राज्य उत्पादन शुल्क स्थानिक पोलिसांच्या मदतीने कारवाई करीत आहे. ढाबा मालकांवरही कारवाई करण्यात येत असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले.

### लोहारा तालुक्यात हॉटेल व ढाब्यावर अवैध दारूचा सुळसुळाट

लोहारा तालुक्यात ४७ खेडेगाव आहेत. या अंतर्गत असंख्य हॉटेल व ढाबे आहेत. त्यात राज्य उत्पादन शुल्क व लोहारा पोलीस स्टेशन यांच्या संगनमताने हा कारभार चालू आहे. लोहारा तालुका मुख्य शहरात, माकणी, सास्तूर, जेवळी, तसेच होळी तांडा येथील गावठी दारू या ठिकाणी खुलेआम दारू विक्री होत आहे. याला पूर्ण सहकार्य उत्पादन शुल्क धाराशिव व पोलीस स्टेशन यांचे आहे. धाराशिवच्या नवीन पोलीस अधीक्षक यांनी या कडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी नागरिक करत आहेत.

# १ ते ६ जून दरम्यान महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षा

आरंभ मराठी | धाराशिव

महावितरणच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ६ जून रोजी महावितरण कंपनीचा २० वा वर्धापन दिन साजरा होत आहे. या निमित्ताने आयोजित विद्युत सुरक्षा सप्ताहादरम्यान मॅरेथॉन, रॅली, निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ग्राहकांना सुरक्षाविषयक ई-मेल व एसएमएस पाठविणे, भित्तीपत्रके, चित्रफिती अशा विविध माध्यमांव्दारे विद्युत सुरक्षेविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे.मागील काही वर्षामध्ये वीज अपघाताचे प्रमाण कमी करण्यात महावितरणला यश आले आहे. मात्र तरीही विविध कारणामुळे अपघात होतात. विद्युत अपघाताचे प्रमाण अजून कमी करण्यासाठी महावितरणने विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करून व्यापक जनजागृती कार्यक्रम हाती घेतला आहे. आम्ही सुरक्षेचे शिल्पकार शुन्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार, हे ब्रिद घेऊन महावितरणच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयात १ ते ६ जूनदरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहात विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.१ जून रोजी सर्व परिमंडळ कार्यालयाच्या मुख्यालयाच्या शहरात मॅरेथॉन 'रन फॉर सेफ्टी' आयोजित करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थी, ग्राहक व जनमित्र यांचेसाठी विद्युत सुरक्षा प्रश्नमंजुषा जाहीर करण्यात आली आहे. या प्रश्नमंजुषेत सहभागी होणाऱ्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. महावितरण कार्यालय / रोहित्र पेटी / आर. एम. यु. /डिजिटल बोर्ड / शिडी गाडी / उपकेंद्र / तक्रार निवारण केंद्र / ग्राहक सुविधा केंद्र / रहिवासी परिसर इ. ठिकाणी विद्युत सुरक्षा



पोस्टर्स लावण्यात येणार असून समाज माध्यमांद्वारे, रेडिओ, टि.व्ही. प्रिंट मिडिया तसेच इतर माध्यमे वापरुन विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती करण्यात येणार आहे. सोमवार,२ जून रोजी राज्यातील ६५० उपविभाग अंतर्गत शहर व ग्रामीण भागातील रहिवासी परिसरात विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती करण्यात येईल. ग्राहकांना विद्युत सुरक्षा विषयी ई-मेल पाठविणे. बाजार व इतर सार्वजनिक ठिकाणी विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती, ३ व ४ जून रोजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी आणि कुटूंबियांसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षा विषयी निबंध / चित्रकला स्पर्धा, महावितरण कर्मचारी / अधिकारी यांच्यासाठी विद्युत सुरक्षा विषयी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ५ जून वसुंधरादिनी १५० विभागीय स्तरावर विद्युत सुरक्षा व वीज बचत विषयी रॅली काढण्यात येणार आहे. ६ जून रोजी सकाळी १०:०० ते १०:१५ या वेळेत राज्यातील सर्व शाखा कार्यालयातील जनमित्र यांच्यासाठी विद्युत सुरक्षा प्रतिज्ञा कार्यक्रम घेण्यातयेणारआहे.

# औषधी व सुगंधी वनस्पती लागवडीसाठी शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

## केंद्र शासनाकडून एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात नव्या घटकाचा समावेश

आरंभ मराठी | धाराशिव

राज्यातील शेतकऱ्यांसाठी औषधी व सुगंधी वनस्पती लागवड ही एक नविन आणि लाभदायक संधी उपलब्ध झाली आहे.केंद्र सरकारच्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत औषधी व सुगंधी वनस्पती लागवड हा घटक सन २०२५-२६ पासून नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. केंद्र शासनाने या घटकासाठी वार्षिक कृती आराखड्यास मान्यता दिली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना अनुदानाच्या माध्यमातून आर्थिक मदतीचा मोठा लाभ मिळणार आहे. या योजनेअंतर्गत जेष्ठमध,शतावरी, कालीहारी, सफेद मुसळी, गुग्गुळ, मंजिष्ठा, कुटकी, अतिस, जटामासी, अश्वगंधा,ब्राम्ही, तुलसी, विदारीकंद, पिंपळी, चिराटा व पुष्करमूळ यासारख्या औषधी वनस्पतींसाठी प्रति हेक्टर १.५० लाख रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. तसेच गुलाब,रोझमेरी,निशिगंध, चंदन,दवणा,लॅव्हेंडर यांसारख्या महाग सुगंधी वनस्पतींसाठीही हे सहाय्य लागू होणार आहे. या योजनेअंतर्गत लागवड साहित्य व INM/IPM/ चा खर्च दोन हप्त्यांमध्ये देण्यात येणार असून,प्रत्येक लाभार्थ्यास दोन हेक्टर पर्यंत लाभ घेता येणार आहे.सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के आणि अधिसूचित क्षेत्रामध्ये ५० टक्के इतके अर्थसहाय्य देण्यात येईल. मागील काळात राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी सन २०१५-१६ ते २०१९-२० दरम्यान ८१८.२३ हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली होती आणि रु. ४१५.१२ लक्ष अनुदान वितरित करण्यात आले होते. मात्र २०२०-२१ पासून ही योजना बंद करण्यात आली होती. आता ही जबाबदारी आयुष मंत्रालयाकडून कृषि मंत्रालयाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. याशिवाय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत देखील औषधी वनस्पतींच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यात आले असून अर्जुन, असान, अशोका, बेहडा, हिरडा,बेल, टेटू,डिकेमाली,रक्तचंदन, रिठा,लोध्रा,आइन,शिवन,गुग्गुळ, बिब्बा व करंज या १६ औषधी वृक्षांना अनुदान देण्यात येणार आहे. औषधी व सुगंधी वनस्पतींची लागवड करण्यासाठी शासनाकडून अनुदानित देण्यात येते.यामध्ये जेष्ठमध/मुलेठी, शतावरी,कलाहरी/ कळलावी, सफेद मुसळी, गुग्गुळ, मंजीष्ठा, कुटकी, अतिस, जटामाशी, अश्वगंधा, ब्राह्मी, तुलसी, विदाराकंद,पिंपळी,चिराटा, पुष्करमूळ यासाठी प्रती हेक्टरी १.५० लक्ष रुपये २ हप्त्यामध्ये देण्यात येतात.तसेच गुलाब, रोझमेरी, निशिगंध, जिरेनियम, कॅमोमाइल, चंदन,दवणा,जाई, लव्हेंडर या सुगंधी वनस्पतींसाठी १.२५ लक्ष रुपये प्रति हेक्टरी अर्थसहाय्य दिले जाते. तर पामरोसा,गवती चहा,तुळस,व्हेटिव्हर जावा,सिट्रोनेला,गोड तुळशीपत्र या इतर सुगंधी वनस्पतींची लागवड करण्यासाठी प्रती हेक्टरी ५० हजार रुपयांचे अर्थ सहाय्य दिले जाते. सर्व इच्छुक शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी . mahadbtmahait.gov.in. या महाडीबीटी पोर्टलवर फलोत्पादन या घटकांतर्गत अर्ज सादर करावा. असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

# कोल्हापूर महापालिका शाळांमधील ओपन बार बंद करण्यासाठी गस्त वाढवा

## आपची बैठकीत मागणी

आरंभ मराठी | कोल्हापूर

दिल्लीमध्ये असलेल्या महापालिकेच्या सुसज्ज आणि स्वच्छ शाळांचा पॅटर्न कोल्हापूर महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये राबववा यासाठी आम आदमी पार्टीने पाठपुरावा सुरू केला आहे. शहरातील महानगरपालिका शाळांची परिस्थिती सुधारावी यासाठी आम आदमी पार्टीच्या वतीने महापालिका शाळांमध्ये जाऊन भौतिक सुविधांचा सर्वे केला होता. याबाबत तयार झालेल्या अहवालानंतर प्रशासकीय अधिकाऱ्यांसह ५४ शाळांच्या मुख्याध्यापकांसमवेत महिनाभरापूर्वी बैठक पार पडली होती. यानंतर महापालिका प्रशासनासोबत झालेल्या बैठकीत सुविधा वाढवण्यासाठी अक्शन प्लॅन करण्याचे ठरले होते. यावर आढावा घेण्यासाठी उपायुक्त कपिल जगताप यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. बैठकीत शाळेतील पायाभूत सुविधा, नवीन वर्ग, पाण्याची सोय, स्वच्छतागृह, ओपन बार, अतिक्रमण, क्रीडा प्रबोधिनी आदी प्रश्नांवर बैठकीत चर्चा झाली.शाळांच्या आवरात फोफावलेल्या ओपन बारवर कारवाई कधी करणार, अशी विचारणा आपचे प्रदेश संघटन सचिव यांनी उपस्थित पोलिस अधिकाऱ्यांना केली.यावर त्यांनी संबंधित ठिकाणी गस्त वाढवून गुन्हे दाखल करू असे सांगितले. आपने केलेल्या पाठपुराव्याने शाळेतील भौतिक सोयीसुविधा सुधारण्यासाठी नऊ कोटी छत्तीस लाख रूपयांचा प्रस्ताव प्राथमिक शिक्षण विभागाने महापालिकेला सादर केला आहे. परंतु वार्षिक बजेटमधून हा खर्च शक्य नसल्याचे प्रशासनाधिकारी यांनी सांगितले. शिक्षण समितीकडे बजेट नसेल तर जिल्हा



नियोजनकडे मागणी करावी, महिला व बालकल्याणमधून ऐंशी लाख रुपये स्वच्छतागृहासाठी तरतूद आहे, त्यामधून निधी घ्यावा, अशी सूचना महासचिव अभिजित कांबळे यांनी केली. सासने मैदानावारील क्रीडा प्रबोधनीचा प्रस्ताव प्रलंबित आहे, त्यावर तातडीने काम करावे तसेच स्वच्छता, खरमाती उठाव यासाठी महापालिकेने विशेष मोहीम राबवण्याची मागणी करण्यात आली. समग्र शिक्षण अभियानातून निधीची मागणी करावी, कामाचा प्राधान्यक्रम ठरवण्यात यावा, महिला व बालकल्याणकडे निधीसाठी प्रस्ताव पाठवावेत अशा मागण्या आप शिष्टमंडळाने केल्या.यावेळी शहराध्यक्ष उत्तम पाटील, सूरज सुर्वे, विजय हेगडे, मयुर भोसले, सहाय्यक प्रकल्प अधिकारी रसूल पाटील, उपशहर अभियंता सुरेश पाटील, ए. के गुजर, कनिष्ठ अभियंता दत्तात्रय पाटील, मीरा नागीमे, चारही पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक आदी उपस्थित होते.

# माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनात गुरुजनांचा सन्मान

आरंभ मराठी | भूम

भूम येथील ईट येथील न्यू हायस्कूल जुनियर कॉलेजच्या सन २००२ - २००३ विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम रायगड मंगल कार्यालय येथे संपन्न झाला असून या सोहळ्यामध्ये माजी गुरुजनांचा विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार सोहळा करण्यात आला.या कार्यक्रमामध्ये माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील बालपणापासून ते दहावीपर्यंत जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात विद्यादेवता सरस्वतीच्या वंदनेने आणि दीप प्रज्वलित करून करण्यात आली. या प्रसंगी शिक्षकांनी जुन्या आठवणीत मजेदार किस्से व अनुभव सांगितले. स्नेहा संमेलन प्रसंगी विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी आपले शाळेतील अनुभव व शिक्षकाप्रती असलेले आदर याबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मुलांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून शासनाच्या सेवेत असलेले चंद्रकांत भोसले यांनी आपल्या शाळेतील अनुभवा बरोबरच पुढील शासकीय सेवेतील अनुभवाचे कथन केले. तसेच भगवान चव्हाण, मुलींमध्ये लंका खरात यांची भाषणे झाली. यावेळी हायस्कूलचे मुख्याध्यापक गायकवाड सर यांनी माजी विद्यार्थ्यांना जीवन जगण्यासाठी योग्य मार्गदर्शन करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज हुंबे, राहुल कुचेकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्याध्यापक गायकवाड सर ,प्रमुख पाहुणे म्हणून डोके सर, ठवरे सर, भोजणे सर, डोके सर, चव्हाण सर, लहाने सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर मुळे यांनी केले.

# ११ वीच्या प्रवेशातील अडथळे संपेनात

## तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी भीम निर्णायक युवाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन

आरंभ मराठी | धाराशिव

राज्य सरकारने ११ वीच्या प्रवेशासाठी एक पोर्टल तयार केले असून, २१ मेला सुरू होणारे पोर्टल २६ मे रोजी चालू झाले. उशिरा का होईना पोर्टल सुरू झाले तरीही यामध्ये गोंधळ चालू आहे. पोर्टलवर प्रवेश प्रकिया संथ गतीने सुरु असून,त्यामुळे विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. ३ जूनपर्यंत प्रवेश प्रक्रियेची मुदत असून, मुदतवाढ द्यावी तसेच प्रवेश प्रकिया गतिमान करण्यासाठी उपाययोजना कराव्यात,अशी मागणी भीम निर्णायक युवाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.निवेदनात म्हटले आहे की, एखादे मोठे पोर्टल तयार करत असताना त्याचा वापर किती लोक करू शकतात याचा अंदाज घेऊन ते पोर्टल तयार करायला हवे. येणाऱ्या अडचणी लक्षात घ्यायला हव्या आणि मग ते वापरासाठी चालू करायला हवे. अकरावी ॲडमिशनसाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या पोर्टल वरील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात.या पोर्टलवर असणारा नोंदणी व लॉगिन करण्याचा टॅब अचानक गायब होतो. लॉगिन केल्यावर अर्जाचा पहिला टप्पा पूर्ण करून पेमेंट करत असताना पेमेंट गेटवे हा खूप स्लो चालतो, बऱ्याच वेळ लोडिंग पेज या स्थितीमध्ये गोल फिरत राहते. बऱ्याचदा पेमेंट केल्यावर ते लवकर अपडेट होत नाही. असे पोर्टल सुरू केल्यानंतर या पोर्टलवरती ऑनलाईन अर्ज करण्याच्या बाबतीत मार्गदर्शन करणारा एक परिपूर्ण व्हिडिओ अपलोड करायला हवा जेणेकरून भरणाऱ्या अर्जदारांना अर्ज करताना सुलभपणे अचूक असा अर्ज भरता येईल, या प्रवेश प्रक्रियेसाठी सर्व महाविद्यालयात एक मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्याच्या सूचना सर्व महाविद्यालयांना देण्यात याव्यात, २६ मे पासून सुरू झालेले पोर्टल तांत्रिक अडथळ्यामुळे व्यवस्थितपणे चालत नसल्याने विद्यार्थ्यांची व पालकांची गैरसोय होत आहे. सर्व बाबी लक्षात घेऊन या प्रवेश प्रक्रियेसाठी हे पोर्टल लवकरात लवकर अद्ययावत करण्यात यावे, जेणेकरून विद्यार्थ्यांची व पालकांची गैरसोय होणार नाही, अशी मागणी भीम निर्णायक युवाच्या वतीने करण्यात आली आहे.निवेदनावर भीम निर्णायक युवा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन दिलपाक, संतोष मुकुंद बनसोडे ,विनोद भाऊसाहेब बनसोडे, आनंद विनायक गाडे, सचिन धर्मा गायकवाड, बालाजी मरगु शितोळे , नंदकुमार हरिबा हावळे व विष्णू उत्तम कांबळे आदींच्यास्वाक्षरीआहेत.

# वारकऱ्यांना मिळणार विम्याचा लाभ

## याहीवर्षी वैद्यकीय सुविधा पुरवणार

आरंभ मराठी | मुंबई



आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती. त्याविषयीची अधिक माहिती प्रसार माध्यमांना देतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

# सावरकर-होळकर जन्मोत्सवानिमित्त नळदुर्ग येथे आयोजित शिबिरात ४२ दात्यांचे रक्तदान

आरंभ मराठी | नळदुर्ग

नळदुर्ग शहरात ब्राह्मण समाज संघटनेच्या वतीने आयोजित स्वा.सावरकर यांच्या १४२ व्या आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याला शहरातील तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी ४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सुरुवातीला नळदुर्ग शहरातील महिलांच्या हस्ते स्वा.सावरकर - महात्मा बसवेश्वर महाराज - व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सौ. संध्याताई भूमकर, सुप्रियाताई परळकर,उज्वलाताई जोशी, शुभदाताई जोशी, मंजुषाताई मोरखंडीकर, उर्मिलाताई वैद्य,दीप्तीताई मोहरीर, अर्चनाताई कासार, वर्षाताई पुराणिक या महिलाच्या हस्ते







पुजन करण्यात आले. यावेळी उत्कर्षा स्मितेश जोशी यांनी जयोस्तुते ही कविता गायली तर मंजुषा मोरखंडीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष नितीन कासार, माजी नगरसेवक बसवराज धरणे, सुधीर हजारे, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, शशिकांत पुदाले, सुनिल उकंडे, सतीश पुदाले, धिमाजी घुगे, पद्माकर घोडके, ज्ञानेश्वर घोडके, सरदारसिंह ठाकुर, श्रमिक पोतदार, विजयकुमार यादगिरे, नेताजी गव्हाणे, बाळासाहेब कुलकर्णी, बाबुराव वैद्य, शशिकांत कुलकर्णी, अशोकराव केसकर, नंदकुमार जोशी, उत्तम रामदासी, किशोर जोशी, प्रमोद जोशी, मुकुंद भुमकर, सुहास पुराणिक, अनिल जोशी, अरुण जोशी,बंडप्पा कसेकर यांच्यासह नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष व माजी नगरसेवक विनायक अहंकारी, सचिव मुकुंद नाईक, सुशांत भूमकर, उपाध्यक्ष प्रदीप ग्रामोपाध्याय,सचिन भूमकर,ज्ञानेश्वर केसकर, अजय देशपांडे, प्रमोद कुलकर्णी, राजकुमार वैद्य, संदीप वैद्य,प्रसन्ना कुलकर्णी, सौरभ रामदासी, मयूर जोशी,संतोष नाईक,गजानन कुलकर्णी,आशुतोष नाईक यांनी परिश्रम घेतले.यावेळी प्रास्ताविक करताना विनायक अहंकारी यांनी म्हटले की, आज जो तो समाज आपापला महापुरुष निवडत आहे महापुरूषांना जातीत अडकवले जात आहे म्हणुन नळदुर्ग ब्राह्मण समाजाने सावरकर - होळकर जन्मोत्सव एकत्रितपणे साजरा करून महाराष्ट्रासमोर एक नवा आदर्श उभा केला आहे. यावेळी मुकुंद नाईक यांनी आभार मानले.

# स्त्री जन्माचे स्वागत करुन सामाजिक उपक्रमाने अनोखी परी हीचा वाढदिवस साजरा

आरंभ मराठी | धाराशिव

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बेटी बचाओ बेटी पढाओ आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखुया स्त्री जन्माचे स्वागत करूया या सदराखाली सामाजिक उपक्रमातुन सामाजिक कार्यकर्ते तथा सदस्य तालुकास्तरीय बाल संरक्षण समिती,ईथिकल कमिटी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे गणेश रानबा वाघमारे यांची कन्या अनोखी परी हिचा बारावा वाढदिवस शासकीय महिला रुग्णालयात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

भारतीय संविधान उद्देशिकाचे सामुदायिक वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.मान्यवरांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले तर नुकत्याच जन्मलेल्या स्त्री जातीच्या बाळाला नवीन कपडे व जन्म दिलेल्या मातेला साडी गुलाब पुष्प मान्यवरांच्या हस्ते देऊन स्त्री जन्माचे स्वागत करण्यात आले. यावेळी एकुण बावीस कपडे व साडी वाटप करण्यात आले.





कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण,महिला रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षका डॉ.स्मिता गवळी, रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतीफ,डॉ.नमन डॉ. राहुल वाघमारे.डॉ.दिग्गज दाबके यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते जन्मलेल्या बाळाला व त्यांच्या मातेला नवीन कपडे व साडी देऊन मुली विषयी जनजागृती करण्यात आली. रुग्णालयाच्या वतीने देखील आकर्षक अशी रांगोळी व सजावट करून पुष्प बुके,मिठाई देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी अधिष्ठाता डॉ शैलेंद्र चव्हाण, वैद्यकीय अधिक्षका डॉ स्मिता गवळी,उप निबंधक सहा.अधिकारी आशा कांबळे,डॉ.दिग्गज दापके,डॉ राहुल वाघमारे,डॉ.नोमानी,रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतीफ, सामाजिक कार्यकर्ते तथा सदस्य तालुकास्तरीय बाल संरक्षण समिती व ईथिकल कमिटी गणेश वाघमारे, बलभीम कांबळे,किसन घरबुडवे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचलन अधिसेविका रिबेका भंडारी तर आभार गणेश वाघमारे यांनी केले. शेख रौफ यांच्या शायरीतुन कार्यक्रमाची सांगता झाली.

CMYK